MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १४/२०१६-१७/ १०६ दिनांकः १०-०८-२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. १४/२०१६-२०१७**

| | |
|---|---|
| श्री नारायण गणपती मुसळे,<br>मु.पो. (अवचितवाडी ) चिमगांव ता. कागल<br>जिल्हा कोल्हापूर. | **तक्रार<br>अर्जदार<br>(ग्राहक)** |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>कोल्हापूर मंडल कार्यालय, कोल्हापूर<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर<br><br>३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग मुरगुड | **विरुध्द<br>पक्षकार** |

**कोरमः-** १. श्री वि. श. गुळवणी, अध्यक्ष
२. श्री. प्र. वि.खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी, अध्यक्ष ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार- श्री नारायण गणपती मुसळे रा. (अवचितवाडी) चिमगांव, ता. कागल जि. कोल्हापूर यांनी दिनांक २२-०६-२०१६ रोजी या मंचाकडे तक्रार अर्ज दाखल करुन त्यात नमूद केले आहे की, त्यांनी दि. २९-०९-२०१५रोजी तलावा वरुन शेतीसाठी पाणी पुरवठा होणेसाठी विद्युत पुरवठा मिळणेसाठी अर्ज करुन दि. ११-०१-२०१६ रोजी आवश्यक ती रक्कम रु.२,७४६/- वि.प. यांचेकडे जमा केली. सदर तलावासाठी त्यांची १ एकर जमिन शासनाने ताब्यात घेतली. त्यांनी मोठया स्वरुपात पाईपलाईन घातली आहे. त्यांना अद्याप विद्युत पुरवठा मिळालेला नाही. सबब त्यांना त्वरीत विद्युत पुरवठा देणेत यावा अशी त्यांची मागणी आहे.

२) वि.प. तर्फे लेखी निवेदन दि. ०७-०७-२०१६ रोजी दाखल करणेत आले आहे. (तथापि त्यांची प्रत त्यांनी तक्रारदार यांना दिलेली नाही) वि.प.यांचे निवेदन पुढील प्रमाणे आहे.

तक्रारदार यांनी ०५ अश्वशक्ती मोटरसाठी कृषिपंप विद्युत पुरवठयाची मागणी केली आणि वितरण कंपनीची रितसर मंजूरी घेऊन दि.११-०१-२०१६ रोजी रक्कम भरली आहे. परंतु त्यांनी मागणी केलेल्या ठिकाणी श्री चिमकाई देवी पाणी पुरवठा संस्था यांनी स्वतःचे खर्चाने DDF स्कीममध्ये काम करुन घेतले आहे. जेष्ठता यादीमध्ये तक्रारदार यांचा १६८ क्रमांक आहे. सदर चिमकाई देवी संस्थेच्या स्कीमच्या रोहित्रावरुन तक्रारदार यांना वीज देता येत नाही. त्यामुळे Infra (पायाभूत आराखडा) स्कीममध्ये मंजूरी घेऊन जेष्ठता यादीप्रमाणे तक्रारदार यांना वीज कनेक्शन देता येणार आहे.

३) सदर प्रकरणाची सुनावणी दि.०९-०८-२०१६ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री किशोर दत्तात्रय शिंदे आणि उपकार्यकारी अभियंता श्री आर. एस. चिकोडी वि.प. तर्फे उपस्थित होते. तक्रादार हे स्वतः उपस्थित होते. या सर्वाचा तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला आहे. उपलब्ध सर्व कागदपत्रे विचारात घेणेत आली आहेत.

४) यामंचाचे निर्णयासाठी खालील प्रमाणे मुद्दे ऊपस्थित होत आहेतः

१) तक्रारदार हे त्यांच्या मागणीनुसार विद्युत पुरवठा मिळणेस पात्र आहेत काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

५) तक्रारदार यांनी यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष , कोल्हापूर यांचेकडे गा-हाणे दिले होते. सदर कक्षाने दि. २३-०५-२०१६ रोजी आदेश करुन , तक्रारदार यांना जेष्ठता यादीनुसार विद्युत पुरवठा देणेत येईल. असा निर्णय दिला. त्या निर्णयावर समाधान झाले नसल्याने तक्रारदार या मंचासमोर तक्रार घेऊन आले आहेत.

६) तक्रारदार यांनी वितरण कंपनीची रितसर मंजूरी घेऊन कृषिपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी आवश्यक ती रक्कम जमा केली याबद्दल वाद नाही. श्री चिमकाई देवी पाणी पुरवठा संस्थेने स्वतःच्या खर्चाने DDF योजनेमध्ये काम करुन घेतले आहे याबद्दल वाद नाही. वि.प. यांचे असे कथन आहे की, सदर चिमकाई देवी संस्थेची योजना त्यांच्या मालकीची असलेने त्यातून तक्रारदार यांना विद्युत पुरवठा करता येत नाही.

७) जेष्ठता यादीमध्ये तक्रारदार यांचा १६८ वा क्रमांक आहे.वि.प. यांचे म्हणणे असे की, इन्फ्रा स्कीम मधून सध्या मार्च-२०१५ पर्यन्तची कनेक्शन्स देण्याची कामे चालू आहेत. तथापि, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाच्या कालावधी आणि भरपाईचे निश्चिती करण ) विनियम २०१४ प्रमाणे तक्रारदार यांना तीन महिन्यात विद्युत पुरवठा सुरु करावयाचे बंधन आहे. तक्रारदारांना विद्युत पुरवठा देण्यासाठी नवीन ऊपकेंद्र सुरु करावयाची आवश्यकता नाही याबाबत फारसा वाद नाही. त्यामुळे तक्रारदार यांना विद्युत पुरवठा देण्यास काही अडचणी असतील तरीही वरील नियम या मंचास निश्चितपणे विचारात घ्यावा लागणार आहे. या प्रकरणात तक्रारदार यांनी कोणत्याही स्वरुपाची भरपाई मागितलेली नाही.

८) तक्रारदार यांची काही जमिन लघुपाटबंधारे तलाव प्रकरणासाठी संपादित झाली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांनी बराच खर्च करुन पाईप लाईन घातली आहे व डिझेल इंजिन बसवून पाटबंधारे खात्याच्या परवान्याप्रमाणे पाणी शेतीसाठी घेत आहेत व त्यासाठी त्यांना जादा खर्च करावा लागत आहे असे त्यांचे म्हणणे आहे. ते काहीही असो, कृती मानकेच्या नियमात नमूद केलेप्रमाणे तक्रारदार हे निश्चित कालावधीत कृषिपंपासाठी विद्युत पुरवठा मिळणेस पात्र आहेत. सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश देणेत येतोः

## **आदेश**

१. वि.प. - वितरण कंपनी यांनी तक्रारदार श्री  नारायण गणपती मुसळे रा. (अवचितवाडी) चिमगांव, ता. कागल जि. कोल्हापूर  यांना नोव्हेंबर २०१६ पर्यन्त, विद्युत पुरवठा सुरु करावा असा त्यांना आदेश देणेत येत आहे.
२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (वि. श. गुळवणी) | (प्र.वि. खपली) | (श्री प्र एस. बुरांडे) |
| अध्यक्ष | सदस्य सचिव | ग्राहक सदस्य |